



शिल्पकार विकासाचा...

# देशदूत




इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २९ । अंक ५२ । रविवार, दि.७ डिसेंबर २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## संकष्ट चतुर्थी!



चंद्रोदय : ०८-३४

## थोडक्यात

### विधिमंडळाची दोन्ही सभागृहे विरोधी पक्षनेतेविना

**मुंबई ।** विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही सभागृहाला सध्या विरोधी पक्षनेता नाही. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विरोधी पक्ष नेत्याच्या शासकीय निवासस्थानी विरोधकांची बैठक होऊन अधिवेशनातील रणनीती निश्चित केली जाते. अधिवेशनात कोणते मुद्दे उपस्थित केले जातील, याची माहिती पत्रकार परिषद घेऊन दिली जाते. मात्र, आता विरोधी पक्षनेताच नसल्याने विरोधकांच्या बैठकीविषयी उत्सुकता आहे. दरम्यान, या अधिवेशनात विरोधकांकडून दोन्ही सभागृहातील विरोधी पक्षनेत्यांच्या नावांना मान्यता देण्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला जाणार आहे. शिवसेना ठाकरे गटाने विधानसभा विरोधी पक्षनेते पदासाठी भास्कर जाधव तर काँग्रेसने विधान परिषदेसाठी सतेज उर्फ बंटी पाटील यांचे नाव निश्चित केले आहे. अधिवेशनात या नावांना विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषदेचे सभापती मान्यता देणार काय, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### आठ कोटींची लाच घेताना रंगेहाथ पकडले

**पुणे ।** पुण्यामध्ये तब्बल ८ कोटी रुपयांची लाच मागण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. येथील धनकवडीमधील एकता सहकारी गृहनिर्माण संस्थेत हा प्रकार घडला आहे. ३३ नवीन सभासदांना शेअर सर्टिफिकेट देणे व भविष्यातील लिलावात हवी ती व्यक्ती विजयी करून देण्यासाठी सहकार विभागाने नेमलेल्या लिक्विडेटर व माजी प्रशासकाने तब्बल ८ कोटी रुपयांची लाच मागितल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. तडजोडीअंती ३० लाख रुपये ॲडव्हान्स स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोन्ही आरोपींना रंगेहाथ पकडले. सध्याचे लिक्विडेटर विनोद माणिकराव देशमुख, सरकारी पॅनेल ऑडिटर भास्कर राजाराम पोळ या दोन्ही आरोपींविरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 800 |
| नवती (२) | : 575 |

## मिरकिली

सेक्सी ड्रेस घालन्यावर दंड लागणार, तर सेक्सी अदांवरही लागायला पाहिजे !





### अयोध्येहून प्रयागराजला जाताना जळगावातील भाविकांच्या बसला ट्रेलरची धडक

# एका महिलेचा मृत्यू ,१५ जण जखमी

**धरणगाव ।** उत्तर प्रदेशातील सुल्तानपूर जिल्ह्यात अयोध्या-प्रयागराज महामार्गावर शनिवारी पहाटे ४ वाजता एक भीषण अपघात झाला. जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यातील अयोध्या येथून रामलला दर्शन घेऊन परत येत असलेल्या भाविकांच्या टूरिस्ट बसला वेगवान ट्रेलरने जोरदार धडक दिली. या अपघातात एका महिला भाविकाचा मृत्यू झाला असून, १५ जण जखमी झाले आहेत.

यासंदर्भात सविस्तर वृत्त असे की, या बसमध्ये सुमारे ४० भाविक होते. हे सर्व जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यातील कल्याणेहोळ येथील रहिवासी आहे. अयोध्या येथे भगवान रामललाचे दर्शन घेऊन प्रयागराज दर्शनासाठी जात होते. कूरेभार चौकात पोहोचताच एक अनियंत्रित ट्रेलरने बसला समोरून जोरदार धडक दिली. धडक इतकी भयानक होती की बस आणि ट्रेलर दोन्ही उलटले. अपघातानंतर घटनास्थळी मोठा गोंधळ उडाला.

स्थानिक नागरिक आणि प्रवासी तातडीने मदतीसाठी धावले आणि उलटलेल्या बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यास सुरुवात केली. सुमारे १५ भाविकांना गंभीर जखमा झाल्या आहेत. जखमींना ॲम्ब्युलन्सच्या मदतीने तातडीने कूरेभार सामुदायिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तेथे डॉ.प्रयेश दीक्षित आणि त्यांच्या टीमने सर्व जखमींच्या उपचाराची सुरुवात केली. उपचारादरम्यान पिंप्राळा परिसरातील सध्या पुणे येथे राहणाऱ्या वर्षा किरण पाटील (४५) या महिलेचा मृत्यू झाला.

पान २ वर

#### अपघातग्रस्तांशी पालकमंत्री संपर्कात

अपघाताचे वृत्त कळताच, या अपघातग्रस्तांना तात्काळ मदत व उपचारासाठी संबंधित प्रशासनाशी पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी संपर्क साधला असून संबंधितांशी त्यांचे बोलणे झाले आहे. तेथील महिला भगिनींशी पण त्यांचे बोलणे झालेलं आहे. त्यांना परत जिल्ह्यात आणण्याची सुध्दा व्यवस्था करण्यात आली आहे.

# लक्षात ठेवा, ॲनाकोंडा गिळणार!

## उद्धव ठाकरे यांचा शिंदे, दादांना सावधानतेचा इशारा

#### निवडणुकीचा अनुभव अत्यंत वाईट

निवडणुकीचा अनुभव अत्यंत वाईट आहे. निवडणुकीत गडबड घोटाळा सुरू आहे. यावेळी पहिल्या प्रथम ज्या निवडणुका अनुभवतोय, तो वाईट आहे. नगरपालिका, नगर पंचायती, जिल्हा परिषद, महापालिका निवडणुका ३१ जानेवारी २०२६ रोजी पूर्वी घ्यायचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. पण अजूनही मुंबई आणि इतर शहरातील मतदार याद्यांमध्ये मोठा घोळ आहे. पण त्याविषयी कोणी काहीही बोलत नाही. सर्वोच्च न्यायालयाने यामध्ये स्वतः जातीने लक्ष घालायला पाहिजे असे उद्धव ठाकरे म्हणाले. भटके कुत्रे असो वा इतर बाबतीत सर्वोच्च न्यायालय लक्ष देते. ते निवडणुका आणि त्यातील घोळाविषयी सर्वोच्च न्यायालय बोललं पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



**मुंबई ।** यापूर्वी मी ॲनाकोंडा हा शब्द वापरला होता. त्याचा अनुभव महायुतीमधील त्यांच्या मित्र पक्षांना यायला लागला असे उद्धव ठाकरे म्हणाले. एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी यांना गिळल्याशिवाय हा ॲनाकोंडा थांबणार नाही असा टोलाही ठाकरे यांनी लगावला. महायुती चा एकसंघपणा म्हणजे गरज सरो वैद्य मरो असे असल्याचा चिमटाही त्यांनी काढला. महायुती सरकारला एक वर्ष पूर्ण झाले. यामुद्दावर या सरकारला डिकोड करायला हवे, असे ते म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी आज पुन्हा भाजपवर निशाणा साधला. त्यांनी महायुतीतील घटक पक्षांना सावधगिरीची इशारा दिला. एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी यांची आणि भाजप यामध्ये पक्ष प्रवेशावरून जुंपल्याचे दिसून आले. त्यात शिंदे सेना आणि भाजपमधील पक्ष प्रवेश वादाचे ठरले. त्यावरून दोन्हीकडील बाजूने थेट युती तुटण्यापर्यंतची भाषा करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील कार्यकर्त्यांची ही पळवापळवी दोघांच्याही जिव्हारी लागल्याचे दिसले. त्यावर नेमकं बोट ठेवत उद्धव ठाकरे यांनी तुफान फटकेबाजी केली.

मुंबईचा महापौर हा भाजपचाच असेल आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच राज्यातील पक्ष चालवतात या विधानाचा उध्दव ठाकरे यांनी समाचार घेतला. हे तीनही पक्ष एकच असल्याचे ते म्हणाले. या पक्षांची नावे आणि निशाण्या वेगळ्या जरी असल्या तरी इतर दोन पक्षं हे भाजपच्या बी टीम असल्याचा टोला ठाकरे यांनी लगावला. त्यांचा मालिक एक आहे, असा चिमटाही उद्धव ठाकरे यांनी काढला. महायुतीमध्ये प्रवेशावरून नाराजी नाट्य सुरु असल्याबाबत ठाकरे यांनी सूचक इशारा दिला.

#### निवडणुका कॅप्चर केल्या

सत्ताधारांमध्ये जे मारामारी सुरू आहे, आधी बूथ कैप्चर व्हायचे पण आता निवडणुका कैप्चर केले जात आहे. स्वत:ची घरे भरण्याचे काम सुरू आहे, असा आरोप ठाकरे यांनी केला. तर गेल्या एक वर्षांपासून मागणी करूनही विरोधी पक्ष नेते पद न दिल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. सरकार विरोधी पक्ष नेते पद द्यायला घाबरत असल्याचे ते म्हणाले. तर इंदू मिल स्मारकाबाबत ट्रस्ट नव्हता तो गेल्या महिन्यात पुनर्गठीत केला आहे. दफ्तर दिरंगाई आहे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला उशीर का होत आहे, याचे कारण काय हे सांगायला पाहिजे. भव्य आणि अति सुंदर स्मारक व्हायला हवे, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली.



## महामानवाला अभिवादन!

**मुंबई ।** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मूलमंत्र आजही समाजाला दिशा देतो. भारताची सार्वभौम राज्यघटना बाबासाहेबांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने तयार केली. या संविधानाच्या बळावरच देशातील सर्वसामान्य नागरिकाला न्याय मिळतो आणि देशाचा कारभार लोकशाही मार्गाने चालतो. या महामानवाला अभिवादन करण्यासाठी संपूर्ण राज्यभरातून आणि देशाच्या विविध कानाकोपऱ्यातून बाबासाहेबांचे अनुयायी मुंबईतील दादरच्या चैत्यभूमीवर आले .

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर येथील चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केले. यावेळी त्यांनी इतर अनुयायांसोबत सरणत्तयं प्रार्थना केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज चैत्यभूमी, दादर येथे महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले. यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री आशिष शेलार, मंत्री संजय शिरसाट व इतर मान्यवर उपस्थित होते.

## ‘इंडिगो’चा गलथान कारभार; हाल सुरुच!

### विमान कंपन्यांच्या मनमानी कारभाराला केंद्र सरकारचा मोठा ब्रेक

**नवीदिल्ली ।** इंडिगोकडूनमागील चार दिवसांपासून विमान उड्डाणे रद्द केली जात आहेत. आज पाचवा दिवस असून अजूनही इंडिगोची सेवा सुरळीत झाली नाही. अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. इंडिगोची सेवा विस्कळीत झाल्याने मोठा हा:हाकार देशात माजला. विमानतळावर मोठी गर्दी बघायला मिळत आहे. प्रवाशांचा संताप सुरू असून दुसऱ्या विमान कंपन्यांनी तिकिट दरांमध्ये मोठी वाढ केली. हेच नाही तर देशातंर्गत प्रवास करण्यासाठी आता लाखो रूपये मोजावी लागत आहेत. दुसऱ्या विमान कंपन्यांनी वाढवलेल्या तिकीट दरामुळे प्रवासी अडचणीत



सापडले आहेत. इंडिगोवर कारवाई सरकारने करावी, अशी मागणी केली जात आहे. यादरम्यानच आता सरकारने अत्यंत मोठा आदेश विमान कंपन्यांना दिला आहे.

परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, गृहमंत्री अमित शहा यांना हस्तक्षेप करून नागरी उड्डाण मंत्रालयाशी बोलावे लागले. त्यामध्येच सरकारने दिलेल्या आदेशानंतर प्रवाशांना मोठा दिलासा मिळालाय. केंद्र सरकारने हस्तक्षेप करून विमान कंपन्यांची मनमानी थांबवण्यासाठी कठोर कारवाई केली आहे. विमान भाडेवाढीवर स्थगिती देण्यात आली. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने सर्व विमान कंपन्यांना निर्देश जारी केले आहेत. सरकारच्या या निर्देशानंतर विमान कंपन्यांची मनमानी थांबणार असल्याचे स्पष्ट आहे. सरकारने सांगितले आहे, भाडे निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त नसावे. इंडिगोची सेवा विस्कळीत झाल्यानंतर दुसऱ्या विमान कंपन्यांनी संधीचा चुकीचा फायदा घेतला आणि स्वत: वाटतील तशी भाडेवाढ केली.

### ग्रेट खलीच्या जमिनीवर बेकायदेशीर कब्जा

**सुरजपूर ।** हिमाचल प्रदेशमधील पांवटा साहिब येथील सूरजपूर येथे प्रसिद्ध रेसलर द ग्रेट खलीच्या जमिनीबाबत मोठा वाद निर्माण झाला आहे. शुक्रवारी सुरजपूर येथील काही महिला द ग्रेट खलीसोबत नाहन येथे पोहोचल्या आणि त्यांनी उपायुक्त प्रियंका वर्मा यांची भेट घेऊन तक्रार मांडली. त्यांनी जमिनीवर बेकायदेशीर कब्जा केल्याचा आरोप करत आपली संपूर्ण तक्रार उपायुक्तांसमोर मांडली. यावेळी खलीने उपायुक्तांना संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली. तसेच निष्पक्षपणे कारवाई करण्याची मागणी केली. त्यांनी सांगितले की, प्रशासनाने योग्य ती चौकशी करावी आणि तिथे राहणाऱ्या कुटुंबीयांसोबत न्याय करावा.

## मुर्शिदाबादमध्ये जागे झाले बाबरीचे भूत

### टीएमसीच्या निलंबित आ.हुमायू कबीर यांनी केली मशिदीची पायाभरणी

**कोलकाता ।** पश्चिम बंगालमधील सत्ताधारी पक्ष असलेल्या तृणमूल काँग्रेसमधून निलंबित आमदार हुमायूं कबीर यांनी बाबरी मशिदीसारख्या मशिदीची पायाभरणी केली आहे. यावेळी त्यांचे समर्थक विटा घेऊन आले होते.

हुमायूं कबीर यांच्या या पावलानंतर परिसरातील सुरक्षा वाढवण्यात आली आहे. या प्रकरणी कोर्टाने मशिदीच्या बांधकामामध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला होता. मात्र हुमायूं कबीर यांच्या या निर्णयानंतर बंगालमधील राजकीय वर्तुळात मोठा वाद उफाळून आला आहे. तसेच प्रशासन संपूर्ण



प्रकरणावर सतर्कतेने लक्ष ठेवून आहे. हुमायूं कबीर यांच्या या निर्णयावरून भाजपा आणि तृणमूल काँग्रेसमध्ये आरोप प्रत्यारोपांना उधाण आले आहे. भाजपा नेते अमित मालवीय यांनी, बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी ह्या याचा वापर राजकीय लाभासाठी करत आहेत असा आरोप केला. कबीर यांचे समर्थक मशिदीच्या बांधकामासाठी परिसरात फिरत आहेत. तसेच पोलिसांचा आपल्याला पाठिंबा मिळत आहे, असा दावा कबीर हे करत आहेत, असा आरोपही मालवीय यांनी केला. दुसरीकडे तृणमूल काँग्रेसने या संपूर्ण प्रकरणावरून भाजपावर आरोप केला आहे. हुमायूं कबीर हे भाजपा आणि आरएसएसच्या मदतीने जिल्ह्यात अशांतता माजवत आहेत, असा आरोप तृणमूल काँग्रेसने केला आहे. तर हुमायूं कबीर हे भाजपाच्या एजंटसारखं काम करत आहेत. तसेच लोकांमध्ये प्रक्षोभक संदेश पसरवत आहेत, असा आरोपही तृणमूलच्या एका वरिष्ठ नेत्याने केला आहे.

## डॉ.मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार साहित्य संमेलनाचे उद्घाटन

**पुणे ।** अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या सातारा येथे होत असलेल्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन भारतीय पातळीवरील ज्येष्ठ लेखिका आणि विचारवंत डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार असून समारोप सोहळ्यास



ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मनित ज्येष्ठ लेखक रघुवीर चौधरी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. संमेलनामध्ये परिसंवाद, मुलाखती, सांस्कृतिक कार्यक्रम, पुस्तकचर्चा, कविसंमेलन अशा भरगच्च साहित्यिक कार्यक्रमांची मेजवानी अनुभवयला मिळणार असल्याचे जोशी यांनी सांगितले.प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी या वेळी उपस्थित होते.

# अधिवेशनात फडणवीस सरकारची कसोटी

## हिवाळी अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात

**नागपूर ।** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार भागीदार असलेल्या कंपनीकडून झालेली बेकायदेशीर



जमीन खरेदी, नाशिकच्या तपोवनमधील वृक्षतोडीच्या विरोधात सुरु असलेले आंदोलन, साताऱ्यातील डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणात भाजपच्या नेत्यांवर होत असलेले आरोप, नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीत राज्य निवडणूक आयोगाने घातलेला घोळ, अतिवृष्टीग्रस्त बाधितांच्या मदतीवरून निर्माण झालेला संभ्रम या पार्श्वभूमीवर उद्या, सोमवारपासून सुरू होणारे राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन फडणवीस सरकारची कसोटी पाहणारे ठरणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत सत्ताधारी महायुतीतील विशेषतः भाजप आणि शिंदे गटात उडालेल्या संघर्षाचे पडसाद अधिवेशनात उमटण्याची शक्यता आहे. मुंबईसह राज्यातील २९ महापालिका, ३२ जिल्हा परिषदा तसेच ३३६ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा लवकरच अपेक्षित आहे.मिनी विधानसभा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या निवडणुकीच्या तोंडावर उपराजधानी नागपूरमध्ये उद्यापासून विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. स्थानिक निवडणुकांमुळे अधिवेशन जेमतेम आठवडाभर म्हणजे १४ डिसेंबरपर्यंत चालणार आहे.

#### निवडणूक आयोगावर नाराजी

अवघ्या ४८ तास आधी राज्यातील २४ नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका पुढे ढकलण्याचा घेतलेला निर्णय, मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मतदान झालेल्या नगरपालिका, नगरपंचायतींची लांबणीवर पडलेली मतमोजणी, मतदार यादीतील गोंधळ, महापालिका निवडणुकीसाठी मतदारांची प्रभागनिहाय करण्यात आलेली विभागणी यामुळे टीकेचा धनी बनलेल्या राज्य निवडणूक आयोगाच्या विरोधातील नाराजी अधिवेशनात व्यक्त केली जाऊ शकते. खुद्द मुख्यमंत्री फडणवीस यांनी आयोगाच्या कारभारात सुधारणा करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यामुळे विरोधी पक्षाकडून निवडणूक आयोगाच्या कारभाराचा मुद्दा लावून धरला जाऊ शकतो.

## ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव रुग्णालयात दाखल

**पुणे ।** येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना पुण्यातील पूना हॉस्पिटलमधील अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती



चिंताजनक आहे. आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पूना हॉस्पिटल येथे जाऊन बाबा आढाव यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. आमचे वडील आणि ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांची प्रकृती अचानक बिघडल्यामुळं गेले दहा दिवस त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं आहे. सध्या त्यांच्यावर हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजित वैद्य आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली आवश्यक ते उपचार चालू आहेत. उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितल्यानुसार, त्यांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आलं आहे.



cmyk